दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 15 मे 2026 | अंक क्र. 352 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

देवा तूंचि गणेशु ।सकलार्थमतिप्रकाशु ।म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ॥ २ ॥



वरील विशेषणांनी युक्त अशा) देवा, सर्वांच्या बुद्धीचा प्रकाश जो गणेश तो तूच आहेस. निवृत्तिनाथांचे शिष्य (ज्ञानेश्वर महाराज) म्हणतात, महाराज ऐका. ॥१-२॥

# राज्याचे मा. उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांचा स्वखर्चातुन पूतळा उभारणी करणार !

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)


परळी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृती चिरंतर जपण्यासाठी स्व. अजितदादांच्या नावे प्रस्तावित शैक्षणिक प्रकल्पांबाबत आज दिनांक 14 मे रोजी सकाळी राज्याच्या उपमुख्यमंत्री ना. श्रीमती सुमित्राताई पवार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यांना निवेदनाद्वारे विविध मागण्या सादर करण्यात आल्या.

परळी शहरातील नैसर्गिक नाले आणि सरस्वती नदीचे अस्तित्त्व धोक्यात आणणारा ४८ कोटी रुपयांचा सिमेंटीकरणाचा प्रस्ताव तत्काळ रद्द करावा, अशी आग्रही मागणी माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथराव देशमुख यांनी केली आहे. याबाबत त्यांनी बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांना लेखी निवेदन दिले असून, या पत्राची प्रत मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनाही पाठवण्यात आली आहे.

परळी नगरपालिकेने आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे शहरातील सरस्वती नदीसह इतर मोठ्या नैसर्गिक नाल्यांच्या दोन्ही बाजूने सिमेंटच्या भिंती आणि तळाशी पूर्णपणे कॉंक्रीटीकरण करण्याचा ४८ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर केला आहे. मात्र, या प्रस्तावामुळे शहराच्या नैसर्गिक जलस्त्रोतांचे आणि पर्यावरणाचे मोठे नुकसान होणार असल्याची भीती व्यक्त होत आहे. मतदारसंघात सध्या अनेक ठिकाणी विकासकामे सुरू आहेत, मात्र यातील काही कामांच्या दर्जाबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. "शासकीय निधीचा विनियोग योग्य पद्धतीनेच झाला पाहिजे," ही भूमिका मांडत, मतदारसंघात होत असलेल्या बोगस कामांची तातडीने चौकशी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. दोषींवर कठोर कारवाई करून कामांचा दर्जा सुधारण्याबाबत उपमुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

### स्वखर्चातून उभारणार स्वर्गीय अजितदादा पवार यांचा पुतळा

परळी शहराच्या वैभवात भर टाकण्यासाठी आणि लोकनेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शहरात त्यांचा भव्य पुतळा बसविण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती त्यांनी केली. विशेष म्हणजे, हा पुतळा दीपक देशमुख हे स्वखर्चातून बसविणार असून, त्याबाबत त्यांनी उपमुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली.



### पशुवैद्यकीय व कृषी विद्यालयाला नाव देण्याचे साकडे

■ परळीत नव्याने मंजूर झालेल्या आणि प्रगतीपथावर असलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालय व कृषी महाविद्यालयाला 'स्वर्गीय अजितदादा पवार साहेब' यांचे नाव देण्यात यावे, असे निवेदनही यावेळी देण्यात आले. शिक्षण आणि कृषी क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची ओळख भावी पिढीला व्हावी, हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे देशमुख यांनी सांगितले. आता या पत्रावर पालकमंत्री आणि प्रशासन काय ? भूमिका घेणार, याकडे संपूर्ण परळी शहराचे लक्ष लागले आहे.

### नद्यांच्या तळाशी कॉंक्रीट घातल्यावर पाणी जिरणार कसे ?

■ परळी नगरपालिकेचा ४८ कोटींचा हा प्रकल्प म्हणजे केवळ 'निधी हडपण्याचा' घाट आहे. राज्य शासन एकीकडे 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही पर्यावरणपूरक मोहीम राबवत असताना, दुसरीकडे परळीतील नैसर्गिक नद्यांच्या तळाशी कॉंक्रीट घालून जलपुनर्भरण प्रक्रिया कायमची बंद केली जात आहे. केवळ ठेकेदारांचे खिसे भरण्यासाठी निसर्गाचा बळी दिला जात आहे. हा घातक प्रकल्प रद्द झाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.

■ — दीपक रंगनाथराव देशमुख

■ (माजी नगराध्यक्ष, परळी वैजनाथ)

## परळीच्या विकासासाठी आणि स्मृती जतनासाठी सुनेत्राताईंची घेतली भेट !

## "पर्यावरण वाचवा, परळी वाचवा" असा सूर आता शहरातील जागरुक नागरिकांमधून उमटत आहे

# पालखी मार्गाच्या विकासाला मुख्यमंत्री फडणवीस यांची गती; आ.धस यांच्या निवासस्थानी महत्वपूर्ण बैठक संपन्न

■ आष्टी(प्रतिनिधी)

वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड ते पंढरपूर पालखी मार्गाच्या विकासासाठी बुधवारी आष्टी येथे महत्वपूर्ण बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या मार्गाच्या विकासासाठी आवश्यक प्रक्रिया गतीने सुरू करण्यात आल्याची माहिती यावेळी आ.सुरेश धस यांनी दिली.

आष्टी येथील आ.सुरेश धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानी झालेल्या बैठकीत पालखी मार्गाचा आराखडा, रस्त्याची रुंदी, लांबी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या मार्गांचे सर्वेक्षण आणि अंतिम मार्ग निश्चितीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराज यांनी सुचविलेल्या या पालखी मार्गामध्ये बीड, अहमदनगर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावांचा समावेश करण्यात आला आहे.

वारकरी भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या या मार्गाचा दर्जेदार व गुणवत्तापूर्ण विकास व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ.सुरेश धस यांनी पत्रव्यवहार केला होता. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी तात्काळ दखल घेत संबंधित विभागाला सर्वेक्षण व आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

या प्रस्तावित पालखी मार्गात पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, निवडुंगा, वाहली, सावरगाव, मुगगाव, इंचरणा, केकाण वस्ती, वनवेवाडी, आष्टी तालुक्यातील मातावळी, मातकुळी, जामखेड तालुक्यातील जामवाडी, जमदरवाडी, सारोळा, खुर्दैठण, घोडेगाव, आपटी, उंडा पिंपळगाव, सटवाई जवळके, शिंदे वस्ती, परंडा तालुक्यातील



चिंचपूर, मशिदीचे, पाटलाचे पांढरवाडी, शेळगाव, तांदळवाडी, देऊळगाव, डोणजे कसाबाचे, बंगालवाडी, मिरगव्हाण तसेच करमाळा तालुक्यातील हिवरे नागोबाचे, लावंडे वस्ती, सालसे, आळसुंदा, वरकुटे, रोपणे, भोगेवाडी, जवळस, अंबड शिराळाचे, विठ्ठल टोणपे वस्ती, अरण, जाधववाडी, बार्डी, मेंढापूर, पखाल, पद्मावती गणपती मार्गे पंढरपूर असा विस्तृत समावेश आहे. या मार्गामुळे वारकरी भाविकांना सुविधा उपलब्ध होण्यासोबतच ग्रामीण भागातील दळणवळण, व्यापार आणि विकासालाही मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराज, सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ धाराशिवचे अधीक्षक अभियंता बंडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आष्टीचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ उपस्थित होते.

# 'सिंधुरत्न समृद्ध योजना 2.0' आणखी तीन वर्षांसाठी राबवणार मंत्रिमंडळ बैठकीत 14 महत्त्वाचे निर्णय

■ मुंबई : वृत्तसंस्था

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (ता. 29 एप्रिल) मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत विविध विभागाशी संबंधित 14 महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी "सिंधुरत्न समृद्ध योजना 2.0" आणखी तीन वर्षांसाठी राबविण्यात येणार आहे, तर कुसुमाग्रज प्रतिष्ठान आणि नाशिक संस्थेला दरवर्षी दहा लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. महत्त्वाचे म्हणजे संत्रा आयात शुल्क परतावा योजना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### मंत्रिमंडळ बैठकीतील 14 महत्त्वाचे निर्णय

पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्याचे सुधारित धोरण. सहा मोठ्या प्रकल्पातून प्रायोगिक तत्त्वावर गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्यात येणार. पाणीसाठा वाढणार, शेतकऱ्यांना सूपीक गाळ मिळणार. धरणांचेही जतन – संवर्धन. (जलसंपदा विभाग) नाशिक जिल्ह्यातील अंबोली-वेळुंजे प्रवाही वळण योजना प्रकल्पासाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यता. (जलसंपदा विभाग) सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यांसाठी "सिंधुरत्न समृद्ध योजना २.०" आणखी तीन वर्षांसाठी राबविण्यात येणार. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या परिणामकारक नियोजनातून जिल्ह्यांचा सर्वंकष विकास साधण्यावर भर.(नियोजन विभाग) वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परिक्षेस बसण्याची संधीची सवलत घेतलेल्या राखीव



प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती आता राखीव प्रवर्गातच होणार. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही. (सामान्य प्रशासन विभाग) विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांना, १२ व २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतर, चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी लागू करण्यास मान्यता. (इतर मागास बहुजन कल्याण) कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक संस्थेला दरवर्षी दहा लाख रुपयांचे अनुदान. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या "साहित्य संस्थांना अनुदाने" योजनेतून सन २०२६-२७ पासून निधी मिळणार. (मराठी भाषा विभाग) नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड) प्रकल्पासाठी आवश्यक अशा जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्कात सवलत देण्यास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम) मृद व जलसंधारण विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित. राज्यातील सुमारे ८ हजार ७६७ पदांना मान्यता. विभागाकरिता ६ हजार ४८१ व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकरिता दोन पदांसह ६ हजार ४८३ पदांव्यतिरिक्त सुमारे २ हजार २८४ वाढीव पदे. विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची फेररचना होणार. (मृद व जलसंधारण) पुणे महानगरपालिकेच्या पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पातील मुळा-मुठा नदीचा विकासासाठी तीन शासकीय जमिनी विनामुल्य हस्तांतरित होणार. मुळा – मुठा संगमवाडी पूल ते बंडगार्डन पूल दरम्यानची नदी पात्रातील, तसेच बॉटेनिकल गार्डन व महिला बाल व सुधार गृहाची जमीन पुणे महापालिकेस प्रकल्प पूर्ण करण्यासाठी देण्यात येणार. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क) रितनंद बलवेद एज्युकेशन फाऊंडेशनला रायगड जिल्ह्यातील (मौजे भाताण, ता. पनवेल) येथील जमीन देण्यास मंजुरी (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)

संत्रा आयात शुल्क परतावा योजना रद्द करण्याचा निर्णय. बांग्लादेशला निर्यात होणाऱ्या संत्र्याकरीता आयात शुल्कात ५० टक्के अनुदान देण्यात येत होते. या योजनेचा राज्यातील शेतकऱ्यांना लाभ होत नसल्याने आणि ही योजना बंद करण्यासाठी अनेक निवेदने आल्याने निर्णय. (पणन विभाग) वैद्यकीय संस्थांच्या इमारतींसाठी विकास शुल्कामध्ये आता पन्नास टक्के सवलत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसारमध्ये सुधारणा करणार. यापुर्वी मिळणाऱ्या २५ टक्क्यांच्या सवलतीत आता ५० टक्क्यांपर्यंत वाढ. (नगर विकास विभाग) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता. राज्य अनुसूचित जमाती आयोगासाठी उपाध्यक्ष पदाची नव्याने निर्मिती. (आदिवासी विकास विभाग) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ (सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७)" मध्ये सुधारणा करण्यास मान्यता. राज्य अनुसूचित जाती आयोगासाठी उपाध्यक्ष पदाची नव्याने निर्मिती. (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग)

# पेपरफुटीनंतर मोठा निर्णय; NEET परीक्षा आता 'या' दिवशी होणार!

■ मुंबई : वृत्तसंस्था

देशभरातील लाखो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा अखेर संपली असून नीट परीक्षा २०२६ ची (NEET 2026) नवी तारीख अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. पेपरफुटीच्या गंभीर आरोपांमुळे ३ मे २०२६ रोजी घेण्यात आलेली नीट परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम, भीती आणि प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, आता अखेर आयोगाकडून नवीन तारीख जाहीर करण्यात आली आहे. देशभरात २ मे २०२६ रोजी नीट परीक्षा पार पडली होती. मात्र परीक्षा संपल्यानंतर काही तासांतच पेपरफुटीचे गंभीर आरोप समोर आले. या प्रकरणाने देशभरात खळबळ उडाली. सुरुवातीला काही राज्यांमधून संशय व्यक्त करण्यात आला, मात्र नंतर राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर आणि लातूरपर्यंत या रॅकेटचे धागेदोरे पोहोचल्याचे समोर आले. काही आरोपींना अटकही करण्यात आली आहे. तपासादरम्यान अनेक धक्कादायक खुलासे होत असून काही विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर परीक्षा होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका पोहोचल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

हे संपूर्ण प्रकरण अत्यंत गंभीर मानत केंद्र सरकारने तात्काळ हालचाली सुरू केल्या. प्रकरणाचा तपास थेट सीबीआयकडे सोपवण्यात आला. सीबीआयने प्राथमिक चौकशीत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे संकेत दिल्यानंतर परीक्षा प्रक्रिया थांबवण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर ३ मे रोजी झालेली नीट परीक्षा रद्द करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, आता




नीट परीक्षा २०२६ची नवी तारीख जाहीर करण्यात आली असून २१ जून २०२६ (21 June 2026) रोजी देशभरात पुन्हा परीक्षा घेण्यात येणार आहे. आयोगाने अधिकृत घोषणा करत विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा तयारीसाठी वेळ दिला आहे. मात्र, परीक्षा पुन्हा द्यावी लागणार असल्याने अनेक विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे वातावरण कायम आहे. गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडून मोठ्या प्रमाणावर आंदोलनं आणि नाराजी व्यक्त केली जात होती. या संपूर्ण प्रकरणावर चर्चा करण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या दिल्लीतील निवासस्थानी काल रात्री उशिरापर्यंत उच्चस्तरीय बैठक पार पडली. ही बैठक तब्बल दोन तास चालली. बैठकीत नीट आणि नेट परीक्षेतील पेपरफुटी, सुरक्षा व्यवस्था, परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला उच्च शिक्षण सचिव सचिन विनीत जोशी, शालेय शिक्षण सचिव संजय कुमार, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह, राहुल सिंग आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आयोगाने यापूर्वीच सीबीआयला पूर्ण सहकार्य करण्याचे स्पष्ट केले आहे. तपासादरम्यान नाशिकहून राजस्थानपर्यंत आणि राजस्थानहून हरियाणापर्यंत पेपर पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. यामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. काही मोठी नावेही या प्रकरणात समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सीबीआयकडून कसून चौकशी सुरू आहे.

# संपादकीय

## आईच्या काळजीतून बनला 'विल्व्ह' ब्रँड

कोईम्बतूरमधल्या एका आईला आपल्या लहान मुलीच्या त्वचेची काळजी वाटली. तिच्या त्वचेची काळजी घेण्यासाठी तिने स्वतः काही संशोधन करत साबण तयार केला. हा साबण फक्त तिच्या मुलीसाठीच नव्हे, तर तिच्या मुलीसारख्या असंख्य मुलींना एकप्रकारे वरदान ठरला. एका आईच्या चिकाटीतून सौंदर्यप्रसाधन क्षेत्रातील ब्रँड निर्माण झाला. हा ब्रँड म्हणजे 'विल्व्ह'. हा ब्रँड निर्माण करणारी ब्रँडेड आई आहे कृतिका कुमारन. केवळ ८,००० ते १०,००० रुपयांच्या गुंतवणुकीतून सुरू झालेला त्यांचा 'विल्व्ह' हा ब्रँड आज २९ कोटी रुपयांच्या उलाढालीपर्यंत पोहोचला आहे.



कृतिकाच्या या प्रवासाची सुरुवात एका आईच्या काळजीतून झाली. तिच्या लहान मुलीला एक्झिमामुळे त्वचेच्या गंभीर समस्या जाणवू लागल्या. बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक सेंद्रिय उत्पादनांचा वापर करूनही अपेक्षित परिणाम मिळाला नाही. अखेरीस, कृतिकाने स्वतः नैसर्गिक घटकांचा वापर करून घरच्या घरी साबण तयार करण्याचा निर्णय घेतला. यूट्यूबवरील व्हिडीओंच्या मदतीने तिने साबण बनवण्याचे कौशल्य आत्मसात केले. शास्त्रोक्त ज्ञान वाढवण्यासाठी कॉस्मेटोलॉजी विषयाचा दोन महिन्यांचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. २०१७ मध्ये तिने शेळीचे दूध, ऑलिव्ह तेल आणि एरंडेल तेल यांसारख्या नैसर्गिक घटकांचा वापर करून साबण तयार करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला घरच्या स्वयंपाकघरात सुरू झालेल्या या उपक्रमाने हळूहळू आकार घेतला. सोशल मीडियाच्या माध्यमातून फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअॅपवरून ऑर्डर येऊ लागल्या. सुरुवातीला प्रामुख्याने कोईम्बतूर आणि तामिळनाडूतील ग्राहकांकडून प्रतिसाद मिळत होता.

मागणी वाढताच, कृतिकाने घरामागेच १,००० चौरस फुटांचे उत्पादन युनिट उभारले. यंत्रसामग्रीत सुमारे १० लाख रुपयांची गुंतवणूक केली. दोन व्यक्तींच्या छोट्या चमूपासून सुरू झालेला हा व्यवसाय आज १०० कर्मचाऱ्यांना रोजगार देणारा उद्योग बनला आहे. 'विल्व्ह' या ब्रँडचे नाव भगवान शिवाच्या पूजेसाठी वापरल्या जाणाऱ्या बेल वृक्षाच्या पानावरून ठेवण्यात आले आहे. हा ब्रँड त्वचा आणि केसांच्या काळजीसाठी ७० हून अधिक उत्पादने तयार करतो. सुरुवातीला मालकी हक्काने सुरू झालेला 'विल्व्ह' हा ब्रँड २०२० मध्ये प्रायव्हेट लिमिटेड कंपनी म्हणून नोंदणीकृत झाला. या ब्रँडने पहिल्याच वर्षात १ कोटी रुपयांची उलाढाल केली आणि तेव्हापासून त्यात सतत वाढ होत गेली असून, काहीच वर्षांत ही उलाढाल २९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

या उत्पादनांचे चार मुख्य गट आहेत. चेहऱ्याची काळजी घेणारे उत्पादन, केसांची काळजी घेणारे उत्पादन, शरीराची काळजी घेणारे उत्पादन आणि 'मिल्क रेंज'. यापैकी 'मिल्क रेंज' ही कृतिकाची खास ओळख ठरली आहे. शेळीच्या दुधावर आधारित क्रीम, सीरम आणि शॅम्पू यांना ग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. आज 'विल्व्ह' ब्रँडची उत्पादने ही स्वतःच्या वेबसाइटवर, विविध ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर, चेन्नई आणि कोईम्बतूरमधील स्टोअरमध्ये उपलब्ध आहेत. कृतिकाच्या मते, त्यांच्या एकूण उत्पादन विक्रीपैकी ५०% विक्री वेबसाईटवरून, २०% प्रत्यक्ष स्टोअरमधून, ३०% ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून होते. कृतिकाचा जन्म तामिळनाडूतील गोबिचेट्टीपलायम नावाच्या एका लहानशा गावात झाला. तिचे वडील वकील आहेत आणि आई गृहिणी. तिचं गाव एक शेतीप्रधान गाव आहे. गावातील प्रत्येकजण एकमेकांना ओळखतो. कृतिकाच्या घरी शेळ्या आणि गुरं आहेत. अशाच गावात ती लहानाची मोठी झाली. गावातील श्री विद्यालय मॅट्रिक्युलेशन हायर सेकंडरी स्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केले. कोईम्बतूरला तिने कुमारगुरू कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजीमधून इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये बी. टेक. केले आणि २००७ मध्ये पदवी प्राप्त केली. इंजिनीअरिंग पूर्ण केल्यानंतर, वयाच्या २१व्या वर्षी तिने तमिळ कुमारनशी लग्न केले आणि ती गृहिणी झाली. तमिळ त्याच्या कुटुंबाच्या सूत निर्मितीवर केंद्रित कापड व्यवसायात गुंतलेला होता. कृतिकाच्या या प्रवासात तमिळने मोठी साथ दिली. तो स्वतः एमबीए पदवीधर आहे. 'विल्व्ह'चा व्यवसाय वाढू लागल्यानंतर तमिळने देखील या व्यवसायात उडी घेतली. आपल्या पत्नीच्या खांद्याला खांदा लावून तो वित्त आणि व्यवस्थापन सांभाळतो, तर कृतिका उत्पादन विभागाची जबाबदारी सांभाळते.

घराशेजारीच कारखाना असल्यामुळे कृतिकाला आई आणि उद्योजिका या दोन्ही भूमिका सहजपणे निभावता आल्या. छोट्या गावात वाढलेली कृतिका आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश करण्याच्या तयारीत आहे. अमेरिका, युनायटेड किंगडम आणि सिंगापूरमधून मागणी येत असून, भविष्यात या बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याची तिची योजना आहे. कृतिका आपल्या व्यवसायातून समाजासाठी योगदान देण्यावर भर देते. तिची कंपनी स्थानिक शेतकरी आणि कारागिरांकडून कच्चा माल घेते. पर्यावरणपूरक पॅकेजिंगचा वापर करते. कार्बन उत्सर्जन कमी करण्यावरही तिच्या कंपनीचा भर आहे. उद्योजिका म्हणून काम करताना कृतिकाने कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये संतुलन राखले. कुटुंबाचा आधार आणि स्वतःची जिद्द यामुळेच ती हे साध्य करू शकली. संगीत, भरतनाट्यम आणि व्हायोलिन यांसारख्या कला जोपासणारी कृतिका आज एक यशस्वी उद्योजिका म्हणून ओळखली जाते. एक आई आपल्या मुलीच्या त्वचेच्या काळजीपोटी यूट्यूब पाहून सेंद्रिय साबण तयार करते. त्या विषयाचा अभ्यास करते. पदविका मिळवते. भविष्यात काही कोटींची उलाढाल करणाऱ्या उद्योगांची निर्मिती करते. हे सारे स्वप्नवत आहे. कृतिका कुमारने हे स्वप्न साकारलंय.

# हातोला गावातील मराठी शाळा वाचवण्यासाठी उच्चशिक्षित युवकांनी उभी केली शिक्षण चळवळ

■ आष्टी प्रतिनिधी

दुष्काळ, बेरोजगारी, ऊसतोड मजुरांच्या मुलांची शिक्षणाची हेळसांड आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत गावाच्या भविष्याचा पाया शिक्षणातून मजबूत करण्याचा निर्धार करत आष्टी तालुक्यातील हातोला गावात एक प्रेरणादायी शैक्षणिक जनचळवळ उभी राहिली आहे. हातोला गावातील गोरगरिबांच्या मुलांनी शिकून मोठे अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर, सी. ए. , फार्मसिस्ट, वकील, एग्रीकल्चरिस्ट शिक्षक, पोलिस विविध क्षेत्रात नोकऱ्या मिळवून गावच आणि कुटुंबाच नाव रोशन करावं.. गावातील युवकांनी उच्चशिक्षण घेऊन पुणे मुंबई येथे नोकऱ्या उद्योग व्यवसाय सुरू आहेत.. एक सामाजिक बांधिलकी म्हणून गावातील गोरगरिबांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावं यांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे..

आज दि. ११ मे २०२६ रोजी, ता. आष्टी, जि. बीड येथील हातोला गावामध्ये गावातील तरुण, महिला, नोकरदार, शिक्षक, पालक व सर्व समाजघटकांनी एकत्र येत जिल्हा परिषद शाळेच्या गुणवत्ता विकास, भौतिक सुविधा व शैक्षणिक उन्नतीसाठी एक व्यापक "शैक्षणिक ब्लूप्रिंट" सादर केली. महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या शिक्षण प्रेरणेच्या विचारांना अभिवादन करत कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीमाई फुले प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री मल्हारी राख पाटील यांनी केले. यावेळी गावाच्या शैक्षणिक भविष्यासाठी विविध उपक्रम जाहीर करण्यात आले. त्यामध्ये "एक व्यक्ती – एक वही – एक पेन" उपक्रम, शाळेसाठी गावकऱ्यांकडून मासिक देणगी योजना, विवाह व इतर शुभकार्य निमित्त देणगी योजना तसेच स्मृतीप्रीत्यर्थ वृक्षारोपण योजना यांचा समावेश होता. या सर्व उपक्रमांना उपस्थित नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात आर्थिक वर्गणी नोंदविली. गावातील नागरिकांनी "शैक्षणिक प्रतिज्ञा" घेत शिक्षणाच्या उभारणीत कायम सहभाग राहील, असा निर्धार व्यक्त केला. गावाच्या शैक्षणिक कार्याचा आराखडा व संपूर्ण "ब्लूप्रिंट" सादरीकरण श्री सतीश आघाव (सी ए) यांनी केले. त्यांनी दुष्काळग्रस्त परिस्थिती, वाढती बेरोजगारी आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक आव्हाने यावर भाष्य करत शिक्षण हाच गावाच्या परिवर्तनाचा मार्ग असल्याचे सांगितले. कार्यक्रमात उपस्थित नागरिक, शिक्षक व युवकांनी आपली मते मांडली. तसेच गोविंदगड संस्थानाचे महंत श्री अशोक महाराज शास्त्री आणि राजे धर्माजी गड संस्थानाचे महंत श्री रोहिदास महाराज शास्त्री यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत गावाच्या एकजुटीचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन युवा उद्योजक श्री अशोक गोल्हार यांनी केले. हातोला गावाने शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा घेतलेला हा संकल्प बीड जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरत असून, "गावाचा विकास शिक्षणातूनच" हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.



या कार्यक्रसाठी गावातील सर्व नागरिक, जिल्हा परिषद आणि न्यू इंग्लिश स्कूल शाळेतील शिक्षक वृंद, पोलिस पाटील, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सरपंच प्रतिनिधी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी शिक्षण नियोजन समितीचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या..

# आष्टी येथे राजसाहेब ठाकरे यांचा वाढदिवस निमित्त 'अखंड हरिनाम सप्ताह' व 'मोफत आरोग्य शिबिरा'चा भक्तिमय वातावरणात समारोप

■ आष्टी (प्रतिनिधी)

हिंदूजननायक मा. श्री. राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आष्टी येथील सायकल गल्लीत आयोजित करण्यात आलेल्या 'अखंड पाच दिवसीय हरिनाम सप्ताह' आणि 'मोफत आरोग्य शिबिरा'चा आज मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात समारोप झाला. गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या या ज्ञानयज्ञाने संपूर्ण आष्टी परिसर मंत्रमुग्ध झाला होता.

या सप्ताहाचे विशेष आकर्षण म्हणजे दररोज पहाटे होणारे काकडा भजन आणि सायंकाळचे कीर्तन होते. आज समारोपाच्या दिवशी ह.भ.प. भागवताचार्य गणेश म. सुडके यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन पार पडले. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी स्व. केशरबाई किसनराव चव्हाण प्रतिष्ठान आणि जगदंबा तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सप्ताहाच्या सांगतादिनी आज भव्य 'मोफत आरोग्य शिबीर' आयोजित करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने त्वचा, केश विकार आणि दंत उपचारांवर तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. 'हेल्थ प्लस फॅमिली केअर



क्लिनिक'च्या डॉ. वर्षा संदीप सायकड आणि 'द डेंटल सोल्यूशन्स'च्या डॉ. निकिता विधाते (शिंदे) यांनी शेकडो रुग्णांची मोफत तपासणी केली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष (शेतकरी सेना) कैलास दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी किशोर मा. विशाल पांनसांडे,श्री. दत्तात्रय रामभाऊ सायकड (पंत), मा. श्री. मुकुंद बुरांडे, मा. श्री. खुळपे सर यांचे विशेष सहकार्य लाभले.

त्रिमंडळ बैठकीत तीन वर्षांच्या मुदतवाढीवर शिक्कामोर्तब; पालकमंत्र्यांकडे अध्यक्षपद, कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी ४०० कोटींची तरतूद

मुंबई : निसर्गसंपन्न कोकणची आर्थिक घडी बळकट करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांच्या सर्वंकष विकासासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी मानली जाणारी 'सिंधुरत्न समृद्ध योजना २.०' राबविण्याचा निर्णय गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. पुढील तीन वर्षांसाठी ही योजना सुरू राहणार असून, त्यासाठी ४०० कोटी रुपयांच्या भरघोस निधीची तरतूद करण्यात आली आहे. या माध्यमातून पर्यटन आणि मत्स्यव्यवसाय या कोकणच्या दोन प्रमुख क्षेत्रांना जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत कोकणच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यावर भर देण्यात आला. नैसर्गिक साधनसंपत्तीचे प्रभावी नियोजन करून स्थानिक नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढवणे, हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. विशेष म्हणजे, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर पालकमंत्र्यांकडे अध्यक्षपद सोपवण्यात आले असून, यामुळे स्थानिक गरजांनुसार प्रकल्पांना गती मिळणे शक्य होणार आहे.

## तिलक वर्मा चमकला, मुंबईने सामना जिंकला; पंजाबचा पाचवा पराभव

■ धरमशाला : वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ मधील ५८ व्या सामन्यात मुंबई इंडियन्सने पंजाब किंग्सचा त्यांच्याच घरच्या मैदानावर ६ गडी राखून पराभव केला. पंजाबने दिलेले २०१ धावांचे विशाल आव्हान मुंबईने १९.५ षटकांत ४ गडी गमावून पूर्ण केले. मुंबईच्या या विजयाचा महानायक ठरला तिलक वर्मा, ज्याने अवघ्या ३३ चेंडूंत नाबाद ७५ धावांची तुफानी खेळी करत सामना शेवटच्या षटकात फिरवला. या पराभवामुळे पंजाब किंग्जच्या प्लेऑफच्या आशांना मोठा धक्का बसला आहे.

### पॉवरप्लेमध्ये मुंबईची भक्कम सुरुवात

धावांचा पाठलाग करताना इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेल्या रोहित शर्मा (२५ धावा) आणि रायन रिकल्टन यांनी मुंबईला ५९ धावांची बिनबाद सुरुवात करून दिली. रिकल्टनने अवघ्या २३ चेंडूंत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ४८ धावांची स्फोटक खेळी केली. नमन धीर (९) आणि रोहित शर्मा स्वस्तात बाद झाल्यानंतर मुंबईची स्थिती ३ बाद ८८ अशी झाली होती. अवघ्या ८८ धावांवर ३ विकेट्स गेल्यानंतर सामना पंजाबच्या बाजूने झुकला होता, पण तिलक वर्माने सामन्याचे चित्र पालटले. तिलकने अवघ्या २५ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने ३३ चेंडूंत ६ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने नाबाद ७५ धावांची मॅचविनिंग खेळी केली. तर शेरफेन रदरफोर्ड (२०) बाद झाल्यानंतर विल्स जॅक मैदानात आला. जॅकने अवघ्या १० चेंडूंत २ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद २५ धावा कुटल्या. त्याने १९व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर (१९.५ षटक) चौकार मारत मुंबईला १ चेंडू राखून थरारक विजय मिळवून दिला.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# परळीत मराठा समाजाच्या आंदोलनाला मोठे यश

## जिजाऊंच्या पुतळ्यासाठी एमआयएमने दिला होता जाहीर पाठिंबा

**परळी वैजनाथ** – परळी शहरात सकल मराठा समाजाच्या वतीने गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाला ऐतिहासिक यश मिळाले आहे. परळी नगरपरिषदेसमोर "मराठा भवन" आणि जिजामाता उद्यानात बालशिवासोबत राजमाता जिजाऊंचा पुतळा बसवण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनास प्रशासनाने अखेर सकारात्मक प्रतिसाद दिला असून संबंधित जागा मराठा समाजाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे.

एमआयएमचा निर्णायक पाठिंबा -

सोमवार, ११ मे २०२६ पासून सुरू असलेल्या या बेमुदत ठिय्या आंदोलनाला राजकीय स्तरावरूनही मोठा पाठिंबा मिळाला. नगरसेविका शेख आयेशा मोसीन (एमआयएम) यांनी या आंदोलनाला आपला जाहीर पाठिंबा दर्शविला. त्यांनी आपल्या अधिकृत पत्राद्वारे स्पष्ट केले की, "मराठा समाजाची ही मागणी अत्यंत न्याय्य आणि योग्य आहे. प्रशासनाने यावर तातडीने निर्णय घेऊन आंदोलन थांबवावे.

पाठिंब्यानंतर तातडीने कार्यवाही

विशेष म्हणजे, काल सकाळी एमआयएमच्या वतीने पाठिंब्याचे पत्र देण्यात आले आणि त्यानंतर काही तासांतच प्रशासकीय हालचालींना वेग आला. प्रशासनाने आंदोलकांच्या मागणीची दखल घेत सदर जागा मराठा समाजाच्या नावावर हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

या निर्णयामुळे आंदोलकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. लोकशाही मार्गाने दिलेल्या लढ्याला मिळालेले हे यश अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.




**नगरसेविका शेख आयेशा मोसीन यांच्या पुढाकारामुळे शहरात सर्वधर्मीय एकतेचे दर्शनही घडले असून, आता लवकरच या ठिकाणी भव्य "मराठा भवन" आणि राजमाता जिजाऊंचा पुतळा उभा राहणार आहे.**

---

# त्वचेसाठी प्रभावी बीटरूट, जाणून घ्या फायदे



**बीटरूटमध्ये लोह आणि व्हिटॅमिन मुबलक प्रमाणात आढळते आणि म्हणूनच प्रत्येकाला आपल्या आहारात बीटरूट समाविष्ट करण्याचा सल्ला दिला जातो. हे आरोग्यासाठीच नव्हे तर त्वचेसाठी देखील प्रभावी आहे. बीटरुटचे सेवन केल्याने त्वचेच्या समस्येपासून मुक्त होऊ शकतो. चला तर मग जाणून घेऊ या कशा प्रकारे बीटरूट आपल्या त्वचेची काळजी घेतो.**

### चमकदार त्वचा मिळवा-

जर आपल्याला चमकदार आणि गुलाबी त्वचा मिळवायची असेल तर आपल्या आहारात बीटरूट आवर्जून वापरावे. या मध्ये आयरन, फास्फोरस,आणि प्रथिने मुबलक प्रमाणात आढळतात, जे निरोगी आणि चमकदार त्वचा देतो. या साठी आपण बीटरुटचे रस देखील पिऊ शकता. बीटरूट किसून चेहऱ्यावर आणि मानेवर लावून 15 मिनिटे तसेच सोडा. नंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या. अशा प्रकारे दररोज त्वचेवर लावल्याने नैसर्गिक गुलाबी चमक मिळेल.





### रुक्ष त्वचे पासून मुक्ती-

बीटरूट मध्ये अँटीऑक्सीडेंट असतात जे शरीरातील रक्तपरिसंचरण वाढवते.हे रुक्ष त्वचेपासून देखील मुक्ती देतो. हे फेस पॅक बनविण्यासाठी 1 चमचा कच्च्या दुधात 2 -3 थेंब बदामाचे तेल किंवा नारळाचे तेल आणि 2 चमचे बीटरूट रस मिसळा आणि हळुवारपणे चेहऱ्यावर मॉलिश करा. 10 मिनिटे तसेच ठेवून स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या. चांगला परिणाम मिळेल.

### गडद मंडळे काढा-

बीटरूट हट्टी गडद मंडळे दूर करण्यात प्रभावी आहे. 1 चमचा बीटरुटचे रस घेऊन त्यात बदामाचे तेल मिसळा आणि डोळ्याच्या खालील भागास मॉलिश करा 15 मिनिटे तसेच ठेवून थंड पाण्याने धुऊन घ्या.

### मुरुमांना निरोप द्या-

मुरुमांमागील मुख्य कारण म्हणजे बंद छिद्र असतात बीटरूट व्हिटॅमिनसी आणि अँटिऑक्सिडंटचे पॉवरहाऊस आहे जे मुरुमांशी मुक्त होण्यासाठी फ्री रॅडिकल्स डेमेजशी लढा देतो. हे दह्यात मिसळून लावा. दह्यात लॅक्टिक ऍसिड आढळते जे त्वचेला एक्सफॉलिएट करून अनलॉग करतो. यामुळे मुरूम कमी होतात. या साठी 2 मोठे चमचे बीटरूटच्या रसामध्ये 1 मोठा चमचा दही मिसळा आणि पेस्ट बनवा ही पेस्ट त्वचेवर लावा 15 मिनिटे तसेच ठेवा नंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या. चांगल्या परिणामासाठी आठवड्यातून 1-2 वेळा हे पॅक वापरा.

# काय सांगता, काकडी मधुमेहासाठी रामबाण आहे

**मधुमेह धोकादायक आजार आहे जो चयापचय अनियंत्रित झाल्यामुळे होतो. टाइप 2 मधुमेह बहुतेक प्रत्येक रुग्णांमुळे आढळतो. आरोग्य तज्ज्ञ सांगतात की मधुमेहाच्या रुग्णांनी आपल्या आहाराविषयी काळजी आणि सावधगिरी बाळगली पाहिजे. मधुमेहा साठी काकडी फायदेशीर आहे.**

### रक्तातील साखरेची पातळी कमी करते-

या मध्ये असलेले घटक गटातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास प्रभावी आहे. अशा परिस्थितीत मधुमेहाच्या रुग्णांसाठी काकडी फायदेशीर आहे.



### लठ्ठपणा कमी करते -

शरीराचे वजन वाढल्याने रक्तातील साखरेची पातळी अनियंत्रित होऊ शकते. अशा परिस्थितीत काकडी शरीराचा लठ्ठपणा कमी करते. या मध्ये कमी कॅलरी आणि पोषक अधिक असतात. म्हणून काकडी खाल्ल्यानं भूक लवकर लागत नाही.

### रोग प्रतिकारक शक्ती वाढवते -

रुग्णांची शक्ती वाढविण्यासाठी काकडी प्रभावी आहे, त्यात मुबलक प्रमाणात अँटी ऑक्सीडेन्ट असतात जे शरीरात मुक्त रेडिकल्सशी लढण्यासाठी सामर्थ्य देतात, या मुळे जुन्या आजाराचा धोका कमी होतो.

### डोळ्यांची दृष्टी सुधारते.

ज्या लोकांना बऱ्याच काळापासून मधुमेहाचा त्रास आहे. त्यांना दृष्टी संबंधित समस्यांना सामोरी जावे लागते. अशा परिस्थितीत काकडी खाणे त्यांच्यासाठी फायदेशीर ठरेल. काकडी व्हिटॅमिन ए चे उत्तम स्रोत आहे. जी डोळ्याची दृष्टी वाढविण्यास उपयुक्त आहे.

### इन्स्युलिन ची पातळी चांगली होते-

काकडीमध्ये अँटी ऑक्सिडंट असतात. जे युरिक ऍसिड नियंत्रित करण्यास मदत करते. या व्यतिरिक्त या मध्ये प्युरीन नसते. जेव्हा शरीरातील युरिक ऍसिडची पातळी चांगली असेल तेव्हाच शरीरात इन्स्युलिनची पातळी देखील चांगली राहते.

### डिहायड्रेशन किंवा निर्जलीकरण होणार नाही-

मधुमेह असलेल्या रुग्णांना वारंवार लघवी करण्याची समस्या उद्भवते, या मुळे पाण्याची कमतरता होऊ शकते. जेणे करून त्यांना थोड्या थोड्या वेळाने तहान लागू शकते. काकडीमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असतात, या मुळे शरीर हायड्रेट राहते.

# चांगल्या झोपेसाठी करा या ३ गोष्टी...

**जर तुम्ही रात्रीची अगदी आरामदायक आणि चांगली झोप घेऊ इच्छिता तर तुम्ही झोपायला जाण्याअगोदर काही गोष्टी डोक्यातून काढणं महत्वाचं आहे. कारण झोपताना डोक्यात इतर कोणत्या गोष्टी असतात तेव्हा त्याचा परिणाम झोपेवर होत असतो.**

**डोक्यातून** मानसिक तणाव, दबलेल्या काही इच्छा आणि तीव्र कडूपणा या भावना डोक्यातून बाहेर काढा अन्यथा तुम्हाला अनिद्राचा त्रास होऊ शकतो. निद्रानाशामुळे उच्च रक्तदाब, कंजेस्टिव हार्ट फेल्योर, डायबिटीज आणि इतर आजारांचा निद्रानाशाशी सरळ संबंध येतो.

हार्ट केअर फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ के के अग्रवाल यांनी सांगितलं की, आयुर्वेदात झोपेमुळे वात आणि पित्त दोष वाढतो.


याचं मुख्य कारण म्हणजे मानसिक तनाव, अपुऱ्या इच्छा आणि मनातील कटूपणा. तसेच त्यांनी सांगितलं की, याचप्रमाणे अनिद्राच्या इतर कारणांमध्ये कफ, अपचन, चहा, कॉफी आणि दारूचे अधिक सेवन कारणीभूत आहे. तसेच वातावरणातील बदलामुळे देखील झोपे फरक पडतो. अनिद्राचे तीन प्रकार आहेत तीव्र, क्षणिक आणि निरंतन चालणारा प्रश्न.

अनिद्रा म्हणजे झोपेत सतत अडथळा येते. स्लीप मेंटीनेंस इन्सोम्निया म्हणजे झोपेत अनेक त्रास होणे. सतत जाग येणे, जाग आल्यावर लगेच झोप न लागणे, योग्य झोप न मिळते, चिंता - काळजी याचा परिणाम देखील झोपेवर होत असतो.



**स्मार्टफोनची बॅटरी दीर्घकाळ टिकावी म्हणून अनेक जण फोन केवळ 80 टक्क्यांपर्यंतच चार्ज करतात. पण तुम्हाला माहिती आहे का? ही पद्धत फायद्याऐवजी तुमचे नुकसानच जास्त करत आहे. फोनच्या बॅटरी हेल्थची काळजी घेण्याच्या नादात तुम्ही आधीच फोनची 20 टक्के पॉवर वापरणे सोडून देता. तज्ज्ञांच्या मते, ही एक मोठी चुकीची समजूत असून यामुळे युझर्सना फोनच्या पूर्ण क्षमतेचा आनंद घेता येत नाही.**

# फोन फक्त ८० टक्के चार्ज करताय का? बॅटरी लाइफ वाढवण्याच्या नादात नुकसान होऊ शकते



तुम्हीही बॅटरी खराब होईल या भीतीने फोन 100 टक्के चार्ज करत नसाल, तर सावधान! सुरुवातीपासूनच फक्त 80 टक्के चार्जिंग केल्यामुळे कालांतराने बॅटरीची कार्यक्षमता नैसर्गिकरित्या कमी होतेच, पण त्यासोबतच तुम्ही वापरत नसलेली 20 टक्के बॅटरीही निकामी ठरते. बॅटरी चार्जिंगशी संबंधित हा मोठा गैरसमज दूर करण्याची वेळ आता आली आहे. फोन चार्जिंगची योग्य पद्धत आणि त्यामागचे सत्य आज आपण जाणून घेणार आहोत.

असे म्हटले जाते की यामुळे बॅटरीच्या आरोग्याचे कमी नुकसान होते. तथापि, हे पूर्णपणे खरे नाही. वास्तविक, फोनची बॅटरी केवळ 80 टक्के चार्ज करून आपण अनवधानाने आपल्या फोनच्या क्षमतेच्या 20 टक्के पहिल्या दिवसापासूनच काढून टाकता. याचा विचार करा की आपण मजबूत बॅटरी असलेल्या फोनवर सर्व पैसे खर्च करता, परंतु 80 टक्क्यांपर्यंत चार्ज करून आपण स्वतः ते जुन्या आणि कमकुवत बॅटरी असलेल्या फोन म्हणून वापरता.

याशिवाय फोनची बॅटरी कालांतराने नक्कीच खराब होते. अशा परिस्थितीत, काही वर्षांनंतर, आपण इच्छित असूनही आपण आपला फोन पूर्ण क्षमतेने वापरू शकणार नाही. या व्यतिरिक्त, या प्रथेचा सॉफ्टवेअर कॅलिब्रेशनवरही वाईट परिणाम होऊ शकतो. ज्यामुळे फोन पूर्ण क्षमतेने काम करणे बंद करतो.

### फोन फक्त 80 टक्क्यांपर्यंत चार्ज का करू नये?

अनेकदा असे दिसून आले आहे की बॅटरीच्या आरोग्याच्या शोधात लोक विसरतात की ते फोन 20 टक्के कमी वापरण्यास सक्षम आहेत. याचा विचार करा की जर तुमच्याकडे 5000अँ बॅटरी असलेला फोन असेल तर तुम्ही फोन 80 टक्के चार्ज करू शकता आणि केवळ त्याची 4000mAh बॅटरी वापरू शकता. अशा परिस्थितीत, पूर्ण पैसे देऊनही तुम्ही फोनची संपूर्ण शक्ती स्वतःहून वापरत नाही.

### 80 टक्के चार्ज केल्यानंतरही बॅटरी कमी होते

या नियमाचा सर्वात मोठा तोटा म्हणजे फोन 80 टक्क्यांपर्यंत चार्ज केल्याने बॅटरीचे हेल्थ कमी होण्यापासून थांबत नाही. वास्तविक, रासायनिक प्रतिक्रियामुळे फोनची बॅटरी चार्ज आणि डिस्चार्ज होते. त्याच्या संरचनेमुळे, काळजीपूर्वक वापरल्यास बॅटरीचे आरोग्य कमी होते. अशा परिस्थितीत, आपण 80 टक्के चार्ज केल्यानंतरही फोनची बॅटरी पूर्णपणे संरक्षित करू शकणार नाही आणि काही वर्षांनंतर, आपण 100 टक्के क्षमतेने वापरू शकणार नाही.

### आजच्या काळात 80 टक्के चार्जिंगची गरज नाही

आजच्या काळात 80 टक्क्यांपर्यंत चार्ज करण्यापेक्षा फोनच्या फीचर्स वापरणे चांगले आहे. हे आपल्या सवयीनुसार फोन रात्रभर फक्त 80 टक्के चार्ज करते आणि आपण फोन वापरताना 100 टक्क्यांपर्यंत चार्ज करते.

---

# लाल भोपळ्याचे चविष्ट भरीत

**लाल भोपळा खाण्यात चविष्ट असतो आणि आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. आपण लाल भोपळ्याच्या बऱ्याच रेसिपी तयार करू शकतो. आज आपण लाल भोपळ्याचे भरीत कसे बनवाचे जाणून घेऊ या. चला तर मग साहित्य आणि कृती जाणून घ्या.**

**साहित्य**- 2 कप लाल भोपळा, 2 अक्ख्या लाल मिरच्या, 1/2 लहान चमचा मेथी दाना, 1 लहान चमचा धणे पूड, 1/2 लहान चमचा हळद, 1 लहान चमचा गरम मसाला, 1 मोठा चमचा तेल. मीठ चवीप्रमाणे.



**कृती**- सर्वप्रथम लालभोपळा सोलून बारीक चिरून घ्या. आता एका मोठ्या भांड्यात पाणी घेऊन त्यात लालभोपळ्याचे

# कडकडीत उन्हापासून त्वचेचे रक्षण करण्यासाठी हे उपाय करा

**जेव्हा उन्हाच्या तीव्र उष्णतेत बाहेर पडतो तेव्हा त्याचा परिणाम आपल्या त्वचेवर होतो. तापमान उष्ण असल्यामुळे चेहरा जळतो आणि निस्तेज दिसतो. अशा परिस्थितीत चेहऱ्याला तजेल आणि टवटवीत करण्यासाठी काही गोष्टीना वापरून चेहरा तरुण आणि तजेल करू शकतो. चला तर मग जाणून घेऊ या. कोणत्या आहेत त्या खास गोष्टी ज्यांना उन्हाळ्यात वापरावे.**

### फेस मिस्ट -

जेव्हा आपण ऑफिसात किंवा घराच्या बाहेर असाल तेव्हा आपल्या जवळ फेस मिस्ट बाळगा.प्रत्येक 1-2 तासानंतर चेहऱ्यावर ह्याचे स्प्रे करा. या मुळे त्वचा हायड्रेट राहील आणि चेहरा निस्तेज देखील दिसणार नाही. सध्या बाजारपेठेत बरेच फेस मिस्ट आढळतात. किंवा आपण हे घरात देखील बनवू शकता.या साठी गरज आहे काही गुलाबाच्या पाकळ्यांची आणि 1 लीटर पाण्याची. सकाळी एका भांड्यात पाणी उकळवून त्या मध्ये गुलाबाच्या पाकळ्या घालून रात्रभर ठेवा.नंतर सकाळी हे पाणी एखाद्या स्प्रे च्या बाटलीत



### कुलिंग फेस पॅक -

चेहऱ्यावर उन्हाने टॅनिंग झाली आहे किंवा जळजळ होता आहे तर हे कुलिंग फेस पॅक आराम देतो. या साठी गरज आहे टोमॅटो आणि मधाची. टोमॅटो वाटून त्यामध्ये मध मिसळा हे मिश्रण चेहऱ्यावर लावा आणि दहा मिनिटे तसेच राहू द्या. जर आपला चेहरा तेलकट आहे आणि उष्णते मुळे तेल निघत आहे तर या पॅक मध्ये थोडंसं हरभराडाळीचे पीठ मिसळा. हे चेहऱ्यावरील जास्तीचे तेल काढून टाकते.



# सर्दी-पडसे झाले असल्यास या गोष्टींचे सेवन करू नका

**बरेच लोक सर्दी झाल्यावर औषधे घेतात, परंतु या काळात काय खावे आणि काय नाही ही काळजी घेणे विसरतात अशा प्रकारच्या वस्तूंचे सेवन करतात ज्यामुळे त्यांना हानी तर होते पण सर्दी पडसं जास्त वाढते. कफाचा त्रास होऊ लागतो म्हणून सर्दी पडसं असल्यास काय घ्यावे आणि काय नाही हे जाणून घेऊ या.**

### दुधाचे पदार्थ -

दूध, दही लोणी सारखे पदार्थ थंड प्रकृती चे असतात जे कफ प्रकृती ला वाढवतात सर्दी पडसं असल्यावर या पदार्थांचे सेवन करू नये. औषधे घेण्यासाठी दुधाचा वापर करता आहात तर दुधाचे प्रमाण कमी करा.

### चमचमीत जेवण-

सर्दी पडसं असल्यावर मसालेदार अन्न घेणे टाळा तिखट, काळीमिरी, घेणे टाळा. या मुळे समस्या वाढू शकते साधें आणि हलके आहार घ्या. मसालेदार अन्न घशाला नुकसान करते.

### चहा कॉफी-

सर्दी पडसे असल्यावर लोक चहा कॉफीचे प्रमाण जास्त घेतात. या मध्ये कॅफिन असते जे लघवीचे प्रमाण वाढवते. या मुळे वारंवार लघवी होण्याची समस्या उद्भवू शकते.



### साखर -

सर्दी झाल्यावर साखरेचे प्रमाण कमी करावे. हे रोग प्रतिकारक शक्तीला कमकुवत करते. म्हणून साखरेचे प्रमाण कमी करणें चांगला पर्याय आहे. खोकला वाढू शकतो.

### सूप-

सर्दी झाल्यावर काही गरम प्यावं असं वाटते क्रिमी सूप हे कफ घट्ट करतो या मुळे सर्दी आणि ताप येऊ शकतो म्हणून या वेळी सूप घेऊ नये. इच्छा असल्यास बिना क्रीमचे घरात बनलेले सूप घ्या.

### बेक्ड फूड-

ही एक प्रकारची चरबी आहे जी हळू-हळू पचते. या मुळे घसा खवखवतो आणि शरीरात चरबी देखील वाढते. जास्त बेक्ड केलेले

# स्वयंपाकघरात कामी येणाऱ्या काही सोप्या कुकिंग टिप्स

- आलं लसूण पेस्ट बनविण्यासाठी त्यामध्ये 3: 2 चा

वाढविण्यासाठी हरभराडाळीच्या पिठात थोडं दूध आणि पाणी

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
• बीड, शुक्रवार, 15 मे 2026

# देशहितासाठी काटकसर हीच खरी देशभक्ती – पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला बीड जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा- शंकर देशमुख



## भाजपा जिल्हाध्यक्षांचे नागरिकांना आवाहन

**आष्टी प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती, वाढते इंधन संकट आणि बदलती आर्थिक परिस्थिती लक्षात घेता देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना काटकसर, इंधन बचत आणि राष्ट्रीय जबाबदारीचे भान राखण्याचे महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे. हे आवाहन कोणत्याही प्रकारची भीती निर्माण करण्यासाठी नसून भविष्यात देशासमोर कोणतीही अडचण किंवा संकट निर्माण होऊ नये, यासाठी खबरदारीचा आणि दूरदृष्टीचा उपाय म्हणून करण्यात आले असल्याचे भारतीय जनता पार्टी बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी म्हटले आहे

प्रसिद्धीत दिलेल्या पत्रकात श्री देशमुख यांनी म्हटले आहे की देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत पंतप्रधानांनी स्वतःच्या ताफ्यात कपात करून आदर्श निर्माण केला असून महाराष्ट्र शासनानेही मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्र्यांचे व अधिकाऱ्यांचे परदेश दौरे रद्द करून जबाबदारीची भूमिका घेतली आहे. शासन आणि प्रशासन स्वतःपासून काटकसरीची सुरुवात करत असल्यामुळे सामान्य नागरिकांनीही यात सहभागी होणे ही काळाची गरज आहे.

ही वेळ राजकारण करण्याची नसून देशहितासाठी एकत्र उभे राहण्याची आहे. पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाकडे विरोधकांनी केवळ राजकीय दृष्टिकोनातून न पाहता राष्ट्रहित, आर्थिक स्थैर्य आणि भविष्यातील सुरक्षिततेच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. देशाच्या हितासाठी घेतलेल्या खबरदारीच्या उपायांमध्ये सर्वांनी सहकार्य करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे.

भारतीय जनता पार्टीचा बीड जिल्हाध्यक्ष म्हणून मी बीड जिल्ह्यातील तमाम नागरिकांना आवाहन करतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या या सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण आवाहनाला प्रतिसाद देऊन राष्ट्रहिताच्या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

**पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनानुसार नागरिकांनी पुढील बाबींवर विशेष भर द्यावा –**

*** इंधनाचा अनावश्यक वापर टाळावा**

*** सार्वजनिक वाहतुकीचा जास्तीत जास्त वापर करावा**

*** वीज बचतीला प्राधान्य द्यावे**

*** अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावे**

*** स्वदेशी आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे**

*** सामाजिक ऐक्य, शिस्त आणि संयम राखावा**

*** देशाच्या सुरक्षेबाबत जागरूक राहावे**

आज प्रत्येक भारतीयाने "देश प्रथम" ही भावना मनात ठेवून पुढे येण्याची गरज आहे. बीड जिल्ह्यातील जनतेने नेहमीच राष्ट्रहिताच्या प्रत्येक उपक्रमात सकारात्मक सहभाग घेतला आहे. याही वेळी बीड जिल्हा देशासाठी आदर्श निर्माण करेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

"राजकारणापेक्षा राष्ट्रकारण मोठे" — या भावनेतून सर्वांनी पंतप्रधानांच्या दूरदृष्टीपूर्ण आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन देशहितासाठी एकजूट दाखवावी, हेच आजचे खरे राष्ट्रीय कर्तव्य आहे. असं शंकर देशमुख यांनी प्रसिद्ध पत्रकार म्हटले आहे

## संजय गांधी निराधार योजना समिती गठीत

# रेणापूरच्या अध्यक्षपदी सतीश आंबेकर तर लातूरच्या अध्यक्षपदी बन्सी भिसे यांची नियुक्ती

**लातूर |** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर तालुका आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार गठित करण्यात आली असून रेणापूर तालुका समितीचे अध्यक्षपदी सतीश आंबेकर यांची तर लातूर तालुका समिती अध्यक्षपदी बन्सी भिसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रेणापूर तालुका आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार गठीत करण्यात आली असून याबाबत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार दोन्ही तालुका समितीच्या अध्यक्ष आणि सदस्यांना नियुक्ती पत्र दिले आहे.





रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या अध्यक्षपदी सतीष रावसाहेब आंबेकर रा. नरवटवाडी यांची तर सदस्यपदी ललीता अरुण कांबळे रा. पानगाव, कस्तुराबाई आत्माराम माने रा. चाडगाव, विठ्ठल काशीनाथ कसपटे रा. निवाडा, संजय लक्ष्मण चव्हाण रा. हरिओम नगर, रेणापूर, गोविंदराव नानासाहेब देशमुख रा. डि. देशमुख, सदानंद केदारनाथ पिंपळे रा. खरोळा, विरेंद्रसिंह गोविंदसिंह चौहान रा. पानगाव, सतिश उध्दराव जाधव रा. बिटरगाव, सुरेश रामराव बुड्डे रा. आनंदवाडी यांचा समावेश करण्यात आला आहे.

लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या अध्यक्षपदी बन्सी भगवानराव भिसे रा. सारसा यांची तर सदस्यपदी परमेश्वर माधवराव पर्वते रा. शिवणी, स्वाती किशोर घुटे रा. एकुरगा, संतोष नारायण गायकवाड रा. सलगरा बु., अंकुश हरिभाऊ कुंभार रा. मुरुड, विनायक मल्हारी मगर रा. रामेगाव, सदाम रशीद शेख रा. मुरुड, सदाशिव सोपान गव्हाने रा. सलगरा, रुपेश सुर्यकांत काळे रा. भातखेडा, बाबासाहेब साहेबराव भिसे रा. गाधवड समितीत यांचा समावेश करण्यात आला आहे.

रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या नवनिर्वाचित अध्यक्ष आणि सदस्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत धानोरा खुर्द ग्रामपंचायतीची तालुकास्तरीय तपासणी



**अंबाजोगाई प्रतिनिधीः-**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत धानोरा खुर्द तालुका अंबाजोगाई या ग्रामपंचायतीची तालुकास्तरीय तपासणी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या तपासणीदरम्यान ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची तसेच गावातील मूलभूत सुविधांची पाहणी करण्यात आली.

तपासणी पथकाने गावातील स्वच्छता, पाणीपुरवठा व्यवस्था, सांडपाणी व्यवस्थापन, नाली स्वच्छता, हरित उपक्रम, सार्वजनिक सुविधा, परसबाग,व्यायाम शाळा, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, उर्दू शाळा,शौचालय, समशानभूमी आधी ग्रामविकास योजनांची पाहणी अक्कलकोट येथून आलेले गटविकास अधिकारी यांच्या टीमने केली. तपासणीसाठी

गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट श्री कवित्के,' विस्तार अधिकारी श्री. माने,श्रीपाटील, श्री. पोतदार या पथकाने धानोरा खुर्द गावाचे तालुकास्तरीय तपासणी केली . तपासणी कामी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुका अध्यक्ष नितीन धुमाळ सचिव शौलेश शिंदे कृषी अधिकारी प्रवीण मोरे, गडदे, ग्रामपंचायत अधिकारी श्री निकम, मेंगले , सुनील मामडगे , प्रमोद जोगदंड, सरपंच पार्वतीबाई पोळ,सहाय्यक कृषी अधिकारी पंडित काकडे, सूर्यकांत धायगुडे, शिपाई असलम सय्यद,जमालुद्दीन सय्यद, माऊली वाघमारे यांनी सहकार्य केले

यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामसेवक, पंचायत समिती अधिकारी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावाच्या विकासासाठी ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्याचेही अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे ग्रामीण भागातील विकासकामांना गती मिळत असून गावांच्या सर्वांगीण विकासासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य: नगर परिषदेकडून परळीत मराठा भवनसाठी 28 गुंठे जागा प्रदान

## आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते जागा हस्तांतरित !

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी वैजनाथ शहरात मराठा भवन उभे राहावे अशी गेल्या अनेक वर्षांपासून ची सकल मराठा समाजाची मागणी होती. ना.पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदे कडून मराठा भवनसाठी 28 गुंठे जागा देण्यात आली आहे. स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधत आज माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण करत ही जागा मराठा भवनसाठी हस्तांतरित करण्यात आली आहे.

वैद्यनाथ मंदिर परिसरात नंदागौळ रस्त्यावर वेताळ मंदिराच्या बाजूला असलेली 28 गुंठे जागा नगरपरिषदेकडून मराठा भवनसाठी नियोजित करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून परळी मध्ये मराठा भवन असावे अशी मराठा समाजाची आग्रही मागणी होती. आता मराठा भवनसाठी ही जागा हस्तांतरित करण्यात आली आहे.लवकरात लवकर सुसज्ज मराठा भवन उभे राहील अशी भूमिका मराठा समाज बांधवांनी व्यक्त केली. या अनुषंगाने आज संबंधित ही 28 गुंठे जागा माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते हस्तांतरित करण्यात आली. यावेळी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन व नियोजित मराठा भवनच्या नाम फलकाचे अनावरण आ.धनंजय मुंडे, नगराध्यक्ष सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या




हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, न. प. गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक व्यंकटेश शिंदे, श्रीकृष्ण कराड, नितीन बागवाले, अनंत इंगळे, प्रा.शंकर कापसे, देवराव लुगडे, नितीन शिंदे, सेवकराम जाधव, उत्तम माने, उत्तम मोरे, इंजि. संजय देशमुख, राजेश ठोंबरे शिवाजी देशमुख, बाबा शिंदे, महादेव गंगणे, दिलीप माने, वैजनाथ सुरवसे, सचिन मराठे,प्रल्हाद सुरवसे, शरद चव्हाण, गिरीश भोसले, डॉक्टर प्रा.पी.एल.कराड, राजेंद्र सोनी, रमेश चौंडे, विजयकुमार खोसे ,न. प. उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, नगर अभियंता ढवळे आदींसह सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी परळीत देखणे मराठा भवन उभे राहील असा विश्वास मराठा समाज बांधवांनी व्यक्त केला. मराठा भवनसाठी ही जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल सकल मराठा समाजाच्या वतीने आमदार धनंजय मुंडे व नगराध्यक्ष सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. सकल मराठा समाजाच्या वतीने परळी नगर परिषदेचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

**मराठा भवन मध्ये काय आहे प्रस्तावित?...**

दरम्यान,सकल मराठा समाजाच्या वतीने परळी येथे उभारण्यात येणाऱ्या मराठा भवन मध्ये समाज उपयोगी उपक्रम राबवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुला मुलींचे वसतीगृह, शिकवणी क्लासेस, अभ्यासिका, नोकरी मार्गदर्शन केंद्र आदी विद्यार्थी कलागुण विकसित करण्यासाठीचे उपक्रम या भवन मधून राबवण्यात येणार आहेत. उद्योग, व्यवसाय मार्गदर्शन, व्यवसायातील बारकावे, येणारी आव्हाने, उद्योजक, व्यावसायिकांचे परिचय मेळावे आदी आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर वधू-वर परिचय मेळावे, सामूहिक विवाह कार्य, शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक, सामाजिक ,व्यावसायिक यासह अनेक विषयावर प्रबोधन मार्गदर्शन मिळावे आयोजित करण्यासाठी मराठा भवन उपयुक्त ठरणार आहे. सर्व गुणसंपन्न पिढी घडविण्याच्या दृष्टिकोनातून ही वास्तू एक महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याचा संकल्प मराठा भवनच्या उभारणीत करण्यात आलेला आहे.

# श्री शनैश्वर जन्मोत्सव व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थी गुणगौरव व रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न



**परळी वैजनाथ |** श्री शनैश्वर जन्मोत्सव व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री शनी मंदिरात १० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व रक्तदान शिबिर मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले.

श्री वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनी मंदिरात दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री शनैश्वर जन्मोत्सवाचे आयोजन रविवार (दि.१०) पासून करण्यात आले आहे. यानिमित्ताने गुरुवारी (दि. १२) छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १० वी १२ वी विद्यार्थ्यांच्या गुणगौरव व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवानेते जयराज देशमुख, भाजपचे युवानेते अश्विन मोगरकर, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवा लांडगे, विश्वस्त रघुनाथ भाग्यवंत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज व विरशैव लिंगायत समाजाचे आराध्य दैवत श्री मन्मथस्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. श्री शनैश्वर जन्मोत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेतील महापुरुषांच्या वेशभूषा स्पर्धेत प्रथम समर्थ पिंपळे, द्वितीय शशीकला उदगीरकर, तृतीय अजंत चौधरी व उत्तेजनार्थ ईशान उदगीरकर यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यानंतर तेली समाजातील १० वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा प्रविण फुटके व आभार उत्तम साखरे तर सुत्रसंचलन शुभांगी साखरे व सिमा साखरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा मधुकर शिंदे,शिवराज सोनटक्के, शिवशंकर जठार, अतुल बेंडे, उत्तम साखरे, चंद्रशेखर फुटके, अशोक पिंपळे, सोमनाथ वाघमारे, रवी अन्नपुर्णे, दिपक साखरे, प्रेम जठार, प्रसाद जठार यांच्यासह श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्ट, श्री शनैश्वर प्रतिष्ठान, तेली युवक संघटना, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, श्री शनैश्वर महिला मंडळाच्या युवक, महिलांनी प्रयत्न केले तर बुधवारी शांभवी क्लिनीकल लॅबच्या वतीने दिपक साखरे यांनी आयोजित केलेल्या मोफत रक्ततपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ३०० वर भाविकांची मोफत रक्ततपासणी करण्यात आली.